# कीर्तन-त्रिदळ

[ श्रीशिवछत्रपति आख्यान ]

लेखक–धेनुदास डोळे

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य.
सं. क्र. २०२५.



REFBK-0016283
REFBK-0016283

मूल्य एक रुपया

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

# ही गादी महर्षि श्रीनारदांची आहे.

कीर्तनकलेसारखी अवघड कला नाहीं. या कलेसारखी बहुगुणी श्रीमंत कलाहि नाहीं. अनेक ललित कलांची साधना केल्याशिवाय कीर्तन करतां येणार नाहीं.

ईश्वराला व समाजाला प्रसन्न करण्याचें सामर्थ्य कीर्तनकारांत असतें. समाजाचा व स्वतःचाही विकास कीर्तनकार करूं शकतो. जागृतीचें व शिक्षणाचें हें प्रभावी व पवित्र साध्यम आहे.

लोकमान्य टिळक म्हणत असत कीं, 'मला कीर्तनकार हवेत. जर कीर्तनकार मला मिळतील तर स्वराज्याची प्रेरणा राष्ट्रांत अधिक प्रभावानें मी निर्माण करूं शकेन.'

दुर्दैव असें आहे कीं, आज या प्रभावी कलेकडे व व्यासपीठाकडे सर्वांचें दुर्लक्ष झालें आहे. कीर्तनाचें मोल आम्ही विसरलों आहों.

गोसेवक धेनुदास डोळे यांचीं कीर्तनें लहानपणापासून मी अनेक ऐकलीं आहेत. ते या गादीचे निष्ठावंत उपासक आहेत. मला लहानपण आठवतें. मी त्यांचे कीर्तन ऐकावयास बसत असे. त्यांचा माझा परिचय अजिबात नव्हता. पण साथीला असलेल्या वाद्यांचा व त्यांच्या हातांतील चिपळ्यांचा नाद अजूनहि माझ्या कानांत घुमतो आहे. त्यांची आख्यानें अजूनही माझ्या मनांत पडसाद उठवीत आहेत. ते संस्कार मी विसरूं शकत नाहीं. त्यांनीं कीर्तनरूपानें मला व अन्य जनतेला अपार संस्कारधन दिलें आहे. मी थोडा फार श्रीमंत आहे. पण ही श्रीमंती गोसेवक धेनुदास डोळे यांच्या पेढीवरून लहानपणापासून लटत असलेल्या दौलतीतूनच निर्माण झाली आहे.

मी कृतज्ञ आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
संमृद्धी योजना
१९७०

# शिवप्रभूचें गुण-संकीर्तन

अखिल महाराष्ट्राचीं निरपवाद दैवतें दोन–एक, श्री शिवाजीमहाराज व दुसरें, लो. टिळक. शिव-प्रभूचें संकीर्तन हें पुस्तक सर्व महाराष्ट्रीयांच्या प्रेमास पात्र होईल, यांत शंका कशाला ?

पडत्या काळांत चढत्या गुणांचें स्मरण होणें अवश्य असतें, हिताचें असते. आज महाराष्ट्रांतच काय, पण सर्व भारतांत, दुराचार व भ्रष्टाचार, विघटना व दुर्घटना, जातीयता व प्रांतीयता, उपासमार व लाचारी यांचें थैमान चालू आहे. अशा वेळीं चारित्र्य, चातुर्य, धैर्य, संघटना कौशल्य व जन-हित-बुद्धि या 'उत्तम गुणांसी नाहीं सीमा' अशा शिवरायाचा प्रताप व गुण-कलाप आठवणें स्वाभाविक व श्रेयस्करच ठरेल. आणि देवाची वा दैवाची जोड त्यांच्या कर्तृत्वाला लाभलेली म्हणून तर, गेल्या पांच-दहा वर्षांत, श्रीशिवाजीमहाराजांचीं चरित्रें व काव्यें, भाषणें व पुराणें, प्रवचनें व कीर्तनें, पूर्वी कधीं नव्हती इतकी चालू आहेत. त्यांचे पुतळे मुंबईपासून इचलकरंजीपर्यंत ठायीं ठायीं उभारले जात आहेत. त्यापासून (चालू नसले तरी) नव्या पिढ्यांना सदाचाराची व सत्कृत्यांची स्फूर्ति मिळेल, हें निःसंशय !

अशा स्फूर्ति-साधनांमध्यें कीर्तन हें महाराष्ट्रांतच प्रभावी ठरलेलें साधन आहे. प्रस्तुत पुस्तकाचे कर्ते श्री. धेनुदास डोळे यांनीं आजवर १५० आख्यानें रचलीं आहेत व हजारों कीर्तनें करून लाखों स्त्री-पुरुषांच्या अंतःकरणांत सद्गुणांची पेरणी व 'हरिख-लतांची लावणी' केली आहे. या पुस्तकांत शिवाजीमहाराजांच्या चरित्रांतील तीन प्रसंगांवर सुबोध सुरस–सुरम्य अशीं तीन आख्यानें आलेलीं आहेत.

कालिदासाच्या भाषेंत सांगावयाचें तर, समुद्रांतील रत्नें किंवा सूर्यनारायणाचे किरण जसे असंख्य, तसेच महाराजांचे गुण. त्यांपैकीं कांहीं उत्कट गुणांचा साक्षात्कार घडविणारे प्रसंग धेनुदासांनीं बहारीनें रंगविलें आहेत—आणि ऐंशीच्या घरांत पोंचलेली त्यांची खणखणीत वाणी तर प्रत्यक्ष कीर्तनांत ते प्रसंग प्रत्यक्ष खडेच करते.

त्रि-दळांत निवड कसली ? 'परंतु पांडवाकडे ओढा,' तसें 'हिरकणी'चें आख्यान विशेषच सुरस वठलें आहे. त्यांत मातृप्रेमाचा महिमा व शिवरायाची गुणग्राहकता सुंदर रीतीनें वर्णिली आहे. पृ. ९ वरील ओव्या तर हिरकणीचें चित्र हुबेहुब उभें करतात. 'आग्र्याहून सुटका' यांत तो तो रस उभा करण्याचें सामर्थ्य त्यांतील कवनांत आहे. कवनांतच काय, पण गद्यांतहि आहे. 'शिवरायांनीं मातृचरण नेत्रोदकानें न्हाणले' अशी शुद्ध मराठी भाषा, सध्यांच्या सर्वतोपरि अशुद्ध वातावरणाच्या पार्श्वभूमीवर, विशेषच उठून दिसते. तसेंच, 'दसऱ्याच्या आधींच दिवाळी उजाडली' अशीं मनोरम वाक्येंहि ते सहज लिहून जातात. अशीं सद्गुणवर्धक व रसपूर्ण अनंत आख्यानें धेनुदासांच्या लेखणींतून व वाणींतून बाहेर पडोत हीच इच्छा !

महात्मा मासिक, पुणें २ }

बा. न. शिखरे

2025 मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर 3095
क्रमांक ६५५२९ दि: ३०९५ 65529 15/3/75

# ही गादी महर्षि श्रीनारदांची आहे.

कीर्तनकलेसारखी अवघड कला नाहीं. या कलेसारखी बहुगुणी श्रीमंत कलाहि नाहीं. अनेक ललित कलांची साधना केल्याशिवाय कीर्तन करतां येणार नाहीं.

ईश्वराला व समाजाला प्रसन्न करण्याचें सामर्थ्य कीर्तनकारांत असतें. समाजाचा व स्वतःचाही विकास कीर्तनकार करूं शकतो. जागृतीचें व शिक्षणाचें हें प्रभावी व पवित्र माध्यम आहे.

लोकमान्य टिळक म्हणत असत कीं, 'मला कीर्तनकार हवेत. जर कीर्तनकार मला मिळतील तर स्वराज्याची प्रेरणा राष्ट्रांत अधिक प्रभावानें मी निर्माण करूं शकेन.'

दुर्दैव असें आहे कीं, आज या प्रभावी कलेकडे व व्यासपीठाकडे सर्वांचें दुर्लक्ष झालें आहे. कीर्तनाचें मोल आम्ही विसरलों आहों.

गोसेवक धेनुदास डोळे यांचीं कीर्तनें लहानपणापासून मी अनेक ऐकलीं आहेत. ते या गादीचे निष्ठावंत उपासक आहेत. मला लहानपण आठवतें. मी त्यांचे कीर्तन ऐकावयास बसत असे. त्यांचा माझा परिचय अजिबात नव्हता. पण साथीला असलेल्या वाद्यांचा व त्यांच्या हातांतील चिपळ्यांचा नाद अजूनहि माझ्या कानांत घुमतो आहे. त्यांची आख्यानें अजूनही माझ्या मनांत पडसाद उठवीत आहेत. ते संस्कार मी विसरूं शकत नाहीं. त्यांनीं कीर्तनरूपानें मला व अन्य जनतेला अपार संस्कारधन दिलें आहे. मी थोडा फार श्रीमंत आहे. पण ही श्रीमंती गोसेवक धेनुदास डोळे यांच्या पेढीवरून लहानपणापासून लुटत असलेल्या दौलतीतूनच निर्माण झाली आहे.

मी कृतज्ञ आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
समृद्धी योजना
१९७०

श्री शिवचरित्रावरील हें कीर्तनत्रिदळ श्री. धेनुदास डोळे यांनीं सर्वांसाठीं सादर केलें आहे. तें टवटवीत आहे. त्याला सुगंध आहे. अशी कीर्तन आख्यानें अधिकाधिक निर्माण झालीं पाहिजेत. नवीन पिढी खरोखर आज उपाशी आहे. तिला दूधहि मिळत नाहीं व शुद्ध गंगोदकहि मिळत नाहीं. ही त्यांची संस्काराची तहानभूक अशा कीर्तनत्रिदळांनीं निश्चित भागेल. त्यांच्या विचार-शक्तीला बाळसें येईल.

हें त्रिदळ फार सुंदर आहे. कीर्तनकार या त्रिदळाचा उपयोग करतील, ही खात्री वाटते. तें उपकारक ठरेल.

बहुत काय लिहिणे ? श्रीतुळजा भवानी श्री. धेनुदास डोळे यांस उदंड यश, आयुष्य व आरोग्य देवो ही प्रार्थना.

आमचें अगत्य असो द्यावें. विज्ञापना लेखन सीमा ।।

श्री शिवराज्याभिषेक शके २९४ कार्तिक शु. १५ } बाबासाहेब पुरंदरे.

# शिवरायाचा आठवावा प्रताप

—श्रीसमर्थ

श्रीशिवराजा म्हणजे रामराजा. शिवराज्य म्हणजे रामराज्य, अशी श्रीसमर्थांची भावना. दोघेहि थोर महान अवतारी पुरुष.

अविधांच्या तावडींत सांपडून शेकडों वर्षे पारतंत्र्याच्या नरकांत पिचत असलेल्या महाराष्ट्राचें 'आनंदवनभुवन' झालें. या दोघां महापुरुषांची ही कर्तबगारी.

'त्यांचें स्मरण हें महाराष्ट्राचें जीवन व त्यांचें विस्मरण हें महाराष्ट्राचें मरण होय.' धुळ्याचे श्रीसमर्थभक्त कै. नानासाहेब देवांनी हा संदेश दिला. श्रीसमर्थांच्या ग्रंथपंथाच्या संशोधनांत त्यांनीं आयुष्याचा क्षण न क्षण वेंचला. महाराष्ट्रापुढें श्रीसमर्थांचा व श्रीरामदासी पंथाचा नवा दिव्य आविष्कार उभा केला.

अशाच प्रकारें छत्रपति श्रीशिवाजी महाराज व तत्कालीन शूर, वीर, मर्द मराठे यांच्या इतिहास संशोधनांत, लेखनांत, श्रवणमननांत, प्रचारांत आयुष्य वेंचणारा एक श्रीशिवभक्त महाराष्ट्रांत जन्मला आहे. त्याचें नांव श्री. बाबासाहेब पुरंदरे.

त्यांच्या प्रकाशित वाङमयाच्या वाचनानेंच हीं कीर्तनचरित्रें महाराष्ट्राचें कानीं घालण्याची मला स्फूर्ति झाली.

हिरकणी, आग्र्याहून सुटका व बाळाजी आवजी हीं तीन आख्यानें या पुस्तकांत समाविष्ट आहेत. प्रसंग दिव्य आहेत, अद्‌भुत आहेत, हृदय थरारून सोडणारे आहेत.

(१) मातेचा पुत्रप्रेमा 'हिरकणीनें' काळाच्या जबड्यांत उडी घेऊन जगास दाखविला.

(२) 'आग्र्याहून सुटका' हा प्रसंग तर साऱ्या जगाला थक्क करून सोडणारा आहे.

(३) क्रूर व जुलमी राक्षसी सत्तेच्या तावडींत सांपडून सर्वस्वाची होळी झालेल्या दीनदुबळ्यांचा कैवार घेऊन त्यांना छळणाऱ्या नराधमांना योग्य शासन करणाऱ्या शिवरायाच्या

पुरुषार्थाचें वैभव ' बाळाजी आवजी ' च्या आख्यानांत आपल्या दृष्टिपुढें उभें राहील.

हीं तीन कीर्तनाख्यानें आबालवृद्ध स्त्री-पुरुषांच्या कानीं जावीं. ' शिवरायाचा प्रताप आठवण्यास ' त्यांना स्फूर्ति मिळावी म्हणून हा अल्पसा प्रयत्न आहे.

ज्यांच्या लेखनावरून हीं कीर्तनाख्यानें लिहिण्याचें मला स्फुरलें, त्यांचाच अभिप्राय लाभला, याबद्दल श्री. बाबासाहेब पुरंदरे यांना मनःपूर्वक धन्यवाद. आख्यानांचें पक्वान्न त्यांचें. मी फक्त वाढण्याचें काम केलें आहे.

माझे स्नेही गांधीवादी साहित्यिक श्री. दा. न. शिखरे यांनींहि आपला अभिप्राय देऊन मला उपकृत केलें आहे. त्याबद्दल मनःपूर्वक धन्यवाद.

पूज्य गोजीवन श्रीचौंडेमहाराज यांच्या प्रेरणेनें व कृपाशिर्वादानें आतापर्यंत सुमारें १५० कीर्तनाख्यानें लिहिलीं आहेत. त्यांपैकीं या त्रिदळासह ९० आख्यानांना प्रसिद्धीचा योग आला, याबद्दल आनंद वाटतो. राहिलेलीं आख्यानें प्रत्येक पुस्तकांत तीन अशा ' कीर्तनत्रिदळ ' स्वरूपांत, यापुढें प्रसिद्ध व्हावींत, असा संकल्प आहे. श्रीसमर्थ गोमातेच्या कृपेनें तो सिद्धीस जाईलच.

श्रीगोवर्धन संस्थेचे कार्यवाह श्रीसमर्थ गोभक्त र. बा. चौंडे यांचें महत्त्वाचें सहकार्य लाभलें आहे.

श्रीसमर्थगोसेविका बनुताई बोरगांवकर यांचें प्रोत्साहन या प्रकाशनाच्या मुळाशीं आहे. अनाथ विद्यार्थी गृहानें प्रकाशनाचें साह्य केल्याबद्दल मनःपूर्वक धन्यवाद. चित्रशाळेच्या सौजन्यानें मुखपृष्ठावरील ब्लॉक मिळाला त्याबद्दल त्यांना धन्यवाद.

शिवरायाचा प्रताप महाराष्ट्रानें सतत आठवावा म्हणून सर्वांनीं हा प्रयत्न करावयाचा आहे.

अ. वि. गृहाच्या लोकसंग्रह मुद्रणालयाचें सदैव सहकार्य आहेच.

१६९१ सदाशिव, पुणें.
कार्तिक शुद्ध १५, शके १८८९

सर्वांचा नम्र
**शं. स. डोळे (धेनुदास)**

REFBK-0016283
REFBK-0016283

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 92263

# १. हिरकणी

विजयादशमीचा दिवस. चौरंगावर भवानी तलवार पुष्पांच्या राशीनें पुजली होती. चारी बाजूला समया उजळल्या होत्या. शिवाजी राजांनीं वंदन करून पुष्पराशींतून ती समशेर हातीं घेतली व शिलंगणास स्वारी निघाली.

१ साकी

दिग्विजयी श्रीछत्रपती शिव विजया-दशमी दिवशी ।
गजारूढ होवोनि निघाला सोनें लुटावयासी ।।
पूजुनि समशेर । संगती सर्व शिलेदार ।।

२ अनुष्टुप्

नगारे चौघडे कर्णे । तुताऱ्या वाजुं लागल्या ।।
शिंगांच्या ललकाऱ्यांनीं । दिशा दाही दणाणल्या ।।

३ आर्या

अष्टप्रधानमंडळ सारे सरदार दरकदारादी ।।
सेनाहि सर्व आली प्राणार्पणें सिद्ध रक्षिण्या गादी ।।

४ अनुष्टुप्

धडाडूं लागल्या तोफा । किल्ले रायगडावरी ।।
गाजला आसमंतांत । दसरा सण यापरी ।।

रायगडावरचा हा प्रसंग. गडावरून तोफा धडाडू लागल्या. गडाखालच्या वाडींत तोफांचे आवाज कानीं येताच, ओले हात पदराला पुशीत पुशीत हिरा अंगणांत आली.

५ दिंडी

**लगबगीनें अंगणीं हिरा आली। दृष्टि सहजचि तिचि रायगडीं गेली ।।**
**आज दसरा शिवराय स्वारी थाट। गडाची ना मज अजुनि गांठभेट ।।**

लग्न झाल्यापासून हिराला गडाचं दर्शन घडलं नव्हतं. तिचं मन गडावर जाण्यासाठी उतावीळ झालं होतं. तिला गड बघावयाची ऊर्मि आली होती.

६ ओव्या (जात्यावरील)

**मला गडाच्या पायथ्याशी । दिलं दैवानं सासर ।**
**नाहीं दर्शन शिवरायाचं । सखा सोयरा परमेश्वर ।।१।।**
**कसा असल बाजार तिथं । कशी शिरमंतांचीं घरं ।**
**कसे असतिल राजाराणी । कधि पाहिन त्यांचीं पोरं ।।२।।**
**वाटतं पैठणी नेसावी । नथ सरजाची नाकांत ।**
**जावं राजाच्या भेटिला । तोडे घालून पायांत ।।३।।**

अंगणांत असं मनोराज्य चाललं होतं, इतक्यांत तान्हं पोर रडत असल्याचा आवाज तिच्या कानावर आला.

७ दिंडी

**ध्वनीं आला इतुक्यांत तिच्या कानीं ।**
**रडत तान्हा धांवली तया स्थानीं ।।**
**स्तनीं लावी शांतवी त्यास माय ।**
**गडीं जाण्याचा विसर परि न होय ।।**

लवकरच पुनव उजाडली. वाडींत घोड्यांच्या टापा खडाखडा वाजल्या. एका आलेल्या घोडेस्वारानं पाटलाला हुकूम सांगितला.

८ आर्या

**हंडे पांच दुधाचे धाडावे आज सांज समयास ॥**
**सांगोनि स्वार गेला तत्क्षणि परतोनि राजभवनास ॥**

हा कोजागरीचा दिवस होता. कोजागरी म्हणजे मनसोक्त गोदुग्ध प्राशनाचा सण. छान चांगले आटीव मसाल्याचें दूध लक्ष्मीला, चंद्राला मध्यरात्रीं समर्पून प्रसाद म्हणून अतिथि अभ्यागतासह आकंठ प्राशन करावयाचें. लक्ष्मी प्रसन्न यामुळें होतें.

९ अभंग

**कोजागरीची पौर्णिमा । येतो उदयाला चंद्रमा ॥१॥**
**फिरे लक्ष्मी घरभर । जागृतास देई वर ॥२॥**
**गृहीं प्रकाश सर्वत्र । जागविती मध्यरात्र ॥३॥**
**लक्ष्मी प्रसन्न त्या होय । पूजिताती धेनूमाय ॥४॥**
**क्षीरसागरा भरती । येते कोजागरी रात्री ॥५॥**
**धेनुदुग्धा नसे मिती । सारे आकंठ प्राशिती ॥६॥**
**धेनुदुग्धे न्हावें राष्ट्र । बोध सणाचा हा स्पष्ट ॥७॥**
**धेनुदास म्हणे देवा । ऐसी कोजागरी दावा ॥८॥**

गडावर कोजागरीचा उत्सव होता. राजवाड्यांत दूध धाडण्याचा हुकूम सांगून स्वार गेला. लगोलग साऱ्या गौळणींना, हिरकणीलासुद्धा पाटलानं बजावलं.

१० आर्या

**धारा सत्वरि काढा गाईंचे कळप जमवुनी सारे ॥**
**न्या दूध राजसदनीं कोजागरि सण निघा त्वरें सारे ॥**

कोजागरी पौर्णिमा म्हणजे गोरसानें पूर्णचंद्राच्या मध्यरात्रीं न्हाऊन निघण्याची पर्वणी. धार्मिक विधि आत्ताच सांगितला.

साऱ्या भारतभर गोरसाची लयलूट होऊन नित्य कोजागरीचा आनंद त्याच्या वाट्याला यावा, अशी परमेश्वराची प्रार्थना करून आतां कथानकाकडे वळूं.

गाईच्या दुधाचे पांच हंडे गडावर दिवस मावळायच्या आंत पोंचले पाहिजेत, असा पाटलाचा हुकूम होतांच जिकडे तिकडे गाईंच्या धारा काढण्याची गडबड उडाली. डोईवर अर्धा, पाव, पाऊण दुधाचे हंडे घेऊन कांहीं गौळणी हिराच्या घरापुढं आल्या. त्यांनीं बिगिबिगि निघण्याबद्दल हिराला हाळी दिली. 'आल्ये ऽ आल्ये ऽऽ थांबा वाईच'. अशी आंतून हिराची साद आली.

थोड्याच वेळांत हिरा बाहेर आली. तिनें पदर सावरला. डोक्यावर चुंबळ ठेवली. घराला कुलूप लावलं, डोक्यावर दुधाचा हंडा घेतला आणि निघाली. उशिराचं कारण गौळणींनीं विचारलं.

११ अनुष्टुप्

**'हिरे' डोईवरी हंडे । उभ्या दारांत ठाकलों ॥**
**वेळ कां लागला इतुका । कळूं दे तरि गे आम्हां ॥**

उत्तर दिलं हिरानं.

१२ ओवी (जात्यावरील)

**तान्हं बायानं लेकरूं । घेतलं होत अंगावर ॥**
**त्याला पाळण्यांत घातलं । निजविला मि श्रीरघुविर ॥**

साऱ्या गौळणी गडावर, जणुं मथुरेला निघाल्या.

१३ पद

गौळणी निघाल्या मथुरेला आनंदें ।
घेवोनि डोइवर गोदुग्धाचे हंडे ॥१॥
चल हिरा बिगि बिगि जाऊं गडावर बाई ।
दिस कलला वेडे कर निघण्याची घाई ॥२॥
मुखि गाणि गात कुणि विनोद चेष्टा करित ।
पातल्या गडाच्या भव्य महाद्वारांत ॥३॥
पाहूनि वैभवा चकित जाहल्या नारी ।
परतल्या दूध देऊन आल्या बाजारी ॥४॥

राजवाड्यांत जाऊन मुदपाकखान्यांत दूध घालून पैसे घेऊन त्या बाजारांत आल्या. बाजारांतला थाट पाहून त्यांचं मन हरखून गेलं.

१४ दिंडी

अयोध्येचा जणुं रायगडीं थाट ।
बघुनि भुलल्या गौळणी भव्य हाट ॥
निघायाची परि घाई फार झाली ।
हिरा रमली 'व्हा पुढं' वदुनि गेली ॥

साऱ्या गौळणींची निघण्याची गडबड चालली. त्या आपसांत बोलूं लागल्या. हिराला घाई करतांना म्हणाल्या,

१५ श्लोक

मला सासुचा बाई ग धाक फार ।
पती फार रागीट देईल मार ॥
दिराच्या शिव्या लाख येतील कानीं ।
असे सासरा खाष्ट संतापि मानी ॥

'हिरा' चल बाई पुर झालं बघणं. तुझं ठीक हाय. उशीर झाला तर तुला कोण बोलणार ?

१६ श्लोक

**मला जाउ घेणार नाहीं घरांत ।**
**नणंदा तिरस्कारिती गे दहांत ॥**
**ठकी खाष्ट शेजार वाईट तीचा ।**
**करी चाहड्या कोप होई पतीचा ॥**

१७ अनुष्टुप्

**राजाराणी तुम्ही दोघं । देवावाणी गरीब तो ॥**
**गेलाया परगावाला । तुला बोलेल कोण ग ? ॥**

'येतीस का, का निघू आम्ही म्होरं' असं साऱ्या जणींनीं म्हणतांच 'व्हा म्होरं आल्येच मी' असे शब्द हिराच्या मुखावाटें नादांत बाहेर पटले. गौळणी निघून गेल्या.

१८ दिंडी

**निघुनि गेल्या गौळणी लगबगीनें ।**
**हिरा रमली पाहून तीं दुकानें ॥**
**तोफ झाली घाबरी पळत गेली ।**
**महाद्वाराची वाट बंद झाली ! ॥**

दिवस मावळला ! दरवाजा बंद झाला !! इषाऱ्याची तोफ झाली !!!

हिरा घाबरली. तिला आपल्या तान्ह्या बाळाची आठवण आली. धावत पळत धापा टाकीत ती दरवाजापाशीं आली. दरवाजा उघडण्यासाठीं तिनं देवडीवरच्या शिपायाजवळ टाहो फोडला !

१९ पद (अहो आर्य जगीं)

बहु घाबरली 'दरवाजा उघडा हो'
फोडियला म्हणुनी टाहो ।।१।।
यकटंच घरी तान्हं लेकरूं देवा।
भेटूं द्या प्राणविसावा ।।२।।
भुक बाळाच्या पोटी भडकल भारी।
ना कुणी तिथं शेजारी ।।३।।
चाल ।। तळमळत असल मम बाळ ।।
कशि आली घातकी वेळ ।।
रडरडुनि सुकुन जाईल ।।
द्या बाबानों पुत्रदान तुम्ही मजला।
दरवाजा लवकर खोला ।।

साऱ्याच शिपायांना त्या लेकुरवाळीची दया आली. ते हळहळले. 'आरं आरं आरं! तान्ह्या लेकराची हाय आई ही!!' पण त्यांच्या हातांत काय होतं? राजाच्या हुकमाशिवाय दरवाजा कुणाच्या देवालाही खोलला जाणं शक्य नव्हतं. किल्ल्या राजवाड्यांत रवाना झाल्या होत्या. त्यांनी तिला धीर दिला व देवडीच्या बाहेरच्या बाजूस बसावयास सांगितले.

२० गज्जल

नको रडुं घाबरू पोरी। कळवितों राजदरबारीं ।।
दयाळू राव दीनांचा। तुला या संकटीं तारी ।।
हुकुम धाडील शिवराजा। मोकळे दार होईल ।।
सुखें जाशील गांवाला। बाळ पोटीशि धरशील ।।

पहारेकऱ्यांनीं किल्लेदाराकडे एक शिपाई पाठविला व राजांच्या कानीं ही हकीकत घालून दरवाजा खोलण्याविषयीं त्यांची आज्ञा आणण्यासाठीं विनंती केली.

पण हिराचा जीव इकडे कासावीस होत होता. तिचं बाळ तिच्या दृष्टीपुढं दिसत होतं. किल्लेदारानं व राजानं आपली आर्जवणी ऐकलीच नाही तर? विचाराचं काहूर डोक्यांत माजलं आणि ती तिथून गुपचूप निसटली!

२१ आर्या

**उचलुनि हळूच हंडा चुकवुनि त्या नजर हवलदाराची ।।**
**पश्चिम भागी आली त्यजुनि मनांतील भीति मरणाची ।।**

चौक्या पहारे चुकवीत चुकवीत ती पश्चिमेच्या एका भयंकर खोल कड्याजवळ येऊन पोचली. चारचारशे पांचपांचशें हाताच्या खोलीचे असे कडे या भागांत बरेच होते. हा कडा म्हणजे मृत्यूची दरीच ती! तिकडून गडावर चढून येण्याची कोणाची हिंमत होती!

त्यामुळें त्या बाजूला चौकी पहारा ठेवण्याची गरजच नव्हती.

२२ अनुष्टुप्

**खोल खोल अती खोल । तुटलेला तो कडा तिथें ।।**
**जबडा जणु मृत्यूचा । काळ विक्राळ ठाकला ।।**

बाळासाठीं बेभान झालेली हिरा तिथं आली. तिनं हंडा खालीं ठेवला. कड्यावरून खालीं डोकावून पाहिलं. काळ्याकभिन्न अंधारांत बुडालेली भयंकर खोल दरी!

इकडे तिकडे पहात पहात तिनें कमरेला पदर खोचला. ओचे सावरून खोचले. खालीं बसली. कड्यावरून पाय खालीं सोडले. हाताचा आधार घेत ती छातीवर ओणवी झाली. पाऊल टेकवण्या-साठीं पायांनीं सांधी सांपटी शोधूं लागली.

२३ कटाव

चार पांचशे हात खोल जो। कडा भयंकर यमराजचि तो।
कोण मराया तिकडे जातो ॥ पुत्रप्रेमें वेडी बनली।
हिरा कड्यावर येऊन बसली। मृत्युची तिज विस्मृति झाली ॥
पाठमोरी होवोनि सोडिले। पाय तिनें कपरीत रोविले।
देहभान हरपोनी गेले ॥ अरुंद इंचा दो इंचांच्या।
कपारी साह्या आल्या तियेच्या। कृपे लाभल्या भगवंताच्या॥
झुंज मृत्युशीं देत निघाली। हिरा कड्याच्या खालीं आली।
घामानें ती सचैल न्हाली ॥ घोरपडीचें आणि सुसरीचें।
संचरलें बळ ध्यान मुलाचें। भानचि नव्हतें तिज देहाचें ॥
गडावरुनि खालीं 'माय' ची मूर्तिमंत आली !

२४ ओवी

बोट बोट वीत वीत। उतरत होती अंतर तोडित।
निसटला असता पाय हात। केवढा घात तो घडता ॥१॥
साप विंचू नाना विखार। दंश घडला असतां जर।
गांधील माशा भराभर। डसल्या असत्या देहास ॥२॥
त्यासरशीं धडाडून कुडी। कोसळती कडो विकडी।
चिंधड्या चिंधड्या मांस आंतडी। झाली असती चोहींकडे ॥३॥
किंकाळी एक फोडून। गेली असती मरून गोळण।
परी दैवाचं बाळ तान्हं। जगली आई तयाची ॥४॥

कड्याखालीं पाय टेकतांच ती त्या उतरणीवरून जंगलांतून पळतच सुटली !

२५ आर्या

अरडी दरडी नाले झाडा-झुडपां मधूनि अडखळत ।
उतरून कड्याखालीं जंगल तुडवीत जाई गृहिं पळत ॥

२६ दिंडी

झाड-झुडपांनीं अंग खरडलेलें । पायीं कंटक कितीतरी रुतुनि गेले ॥
झुंज देउनि जिंकिला तिनें काळ । गृहीं आली भेटला तिला बाळ ॥

२७ साकी

वायुगतीनें धांवत आली बाळ पोटिशीं धरिला ।
पान्हा फुटला पदराखालीं घेऊनि त्या शांतविला ॥
राज्य तिला भेटे । जणुं शिवरायाहुन मोठ्ठें ॥

हिरा गड उतरत होती आणि इकडे गडावर तिच्या शोधाची गडबड सुरू झाली होती. पहारेकऱ्याची सहज नजर हिरा बसली होती तिकडे गेली. हिरा दिसली नाही !

२८ दिंडी

नजर गेली सहजची आसपास । नाहीं दिसली कोठेंहि हिरा त्यास ॥
कुठें गेली ती शोध सुरू झाला । ध्वनी राजाच्या कानिं सहज गेला ॥

गौळण हरवली. गेली कुठं हे कुणालाच कळेना. लेकुरवाळी गौळण गडावर अडकली अन् आतां कुठं गेली ? शिवाजी राजांना मोठं आश्चर्य आणि कुतूहल वाटलं. दरवाजे बंद असतांना बाई जावी कुठं ! त्यांनीं किल्लेदाराला हुकूम केला.

२९ आर्या

**धावा मशालि लावा धुंडा गड गौळणीस आधि शोधा ।।**
**लेंकुरवाळी बाळा राहूं द्या अन्य सर्वही धंदा ।।**

गडावरच घरनंघर पाहिलं. मशाली घेऊन चोहोंकडे तटाच्या बाजूंकडेहि माणसें गेली. कुठ्ठे शोध लागेना. राजांना चिंता वाटू लागली. बाई गेली कुठं ?

इतक्यांत एक मावळा एका हातीं मशाल व एका हातांत हंडा घेऊन राजाकडे धांवत आला व मुजरा करून आदबीनें म्हणाला,

३० श्लोक

**हंडा गौळणिचा कडयानजिक हा हातीं आला माझिया ।**
**शोधाया तिजला बहूत श्रमले ना गौसली राजया ।।**
**गेली टाकुनियां उडी कडयावरुनि ती मेली गमे गौळण ।**
**राजा दुःखित जाहला हळहळे दुःखीत सारेजण ।।**

शिवाजीराजांनीं तावडतोब किल्लेदारास दुसरा हुकूम सोडला.

३१ अंजनीगीत

**शे सव्वाशे जवान धाडा । गडाखालतीं शोधुन काढा ।**
**गेली माय फोडुनि हंबरडा । आहे कीं कोठें ? ।।**

राजे म्हणाले ' मावळतीच्या कडयाखालच्या जंगलांत शोध करा. 'माऊलीचं काय झालं असेल ! जगदंब ! ! जगदंब ! ! ' शेकडो मावळे मशालीसह गडाखालीं धावत सुटले. त्यांनीं

३२ ओवी

**धुंडाळिला सारा प्रांत । संपून गेली सारी रात्र ।।**
**सर्व जाहले चिंताक्रांत । परी हिरा न गवसली ।।**

रात्रभर शोध करून हिरा सांपडली नाहीं. वाघा-लांडग्यांनीं तिचं प्रेत कुठं तरी खोल दरींत नेऊन खाऊन टाकलं कीं काय झालं देवाला ठाऊक! शोधणारे सारे कष्टी अंत:करणानें गडावर परतले!

बाई कड्यावरून कोसळून मेलीच असली पाहिजे, अशी महाराजांची खात्री झाली. उजाडतांच त्यांनीं तिच्या घराकडे स्वार पिटाळण्याची आज्ञा केली. बिचारीच्या घरचीं माणसं काळजींत बुडून गेलेली असतील म्हणून--

३३ आर्या

**वाडींत वृत्त कळवा हंडा देवोनि स्वार धाडोनी ॥**
**बाळास्तव हो गेली माता बलिदान प्राण सोडोनी ॥**

घोड्यांच्या टापा हिराच्या घरापुढं वाजल्या. हिरा दारांत सडा शिंपीत होती. तिचं लक्ष स्वाराकडं गेलं. एका स्वाराच्या हातांत तिचा हंडा होता. हिरा हंडा घ्यायला पुढं झाली. 'ह्यो माझाच हंडा. राती गडावरच राहयला हो' असे तिचे शब्द ऐकतांच स्वार आश्चर्यचकित झाले. जी बाई 'गेली' म्हणून कडू निरोप सांगायला आपण आलों तीच आपल्या पुढं 'दत्त' म्हणून उभी!

३४ पद

**टकमक बघती स्वार तिजकडे । तीहि त्यांकडे पाहतसे ।**
**'हंडा माझा विसरुन आल्यें' क्षमा याचना करीतसे ॥१॥**
**जिवंत पाहुन त्या गौळणिला। तटस्थ झाले स्वार मनीं ।**
**'कुठून आलिस कशी उतरलिस। सांग' म्हणाले 'आम्हां झणीं' ॥२॥**
**'घरीं लेकरूं होत उपाशी । कडा उतरुनी आलें म्हणुन' ।**
**कोप नृपाचा होइल आलं । मनांत गेली तिथुन पळुन ॥३॥**

३५ आर्या

**वृत्त गडावर कळलें गौळण आहे जिवंत वाडींत ।।**
**आश्चर्यांत बुडाले नृपतीसह गडकरी आनंदांत ।।**

अष्टप्रधानांनीं तोंडांत बोटं घातलीं. पांच हजारांचा तोडा बक्षीस लावला असता तरीहि कुणी गडी हें धाडस करायला तयार झाला नसता. आणि ही कोवळी पोर—मोठच आश्चर्य ! पंतांच्या तोंडून हे उद्‌गार बाहेर पडतांच महाराज म्हणाले.

३६ पद (चाल संग्राम गीत)

**आश्चर्य कशाचें पंत । मातेची माया वेडी ।।**
**प्रेमाचा सागर पोटीं । करि प्राणांची कुरवंडी ।।**
**'आईपण' अद्‌भुत ऐसें । गाजलें असें नवखंडी ।।**
चाल ।। **आठवली जिजाई माता ।**
**करि अपार मजवरि ममता ।**
**किति वर्णुं गुणांची गाथा ।।**
**मुखि शब्द नृपाच्या येई । मातेसम दैवत नाहीं ।।१।।**
**मायेची गौळण मूर्ती । पाहूं द्या डोळे भरून ।।**
**तुडवून यमाची छाती । जी गेली गड उतरून ।।**
**पाठवा पालखी तिजला । सन्मानें या घेऊन ।।**
चाल ।। **बाळास्तव वेडी झाली ।**
**प्राणार्पण करण्या सजली ।**
**गृहि वायुगतीनें गेली ।।**
**सन्मानूं तिज या ठायीं । मातेसम दैवत नाहीं ।।२।।**

पंतप्रधान मोरोपंतांनीं 'आज्ञा महाराज' म्हणून मुजरा केला.

स्वार शिपाई आणि पालखी हिराच्या घरापुढं आली. वाडीं-तल्या आयाबाया हातचीं कामं टाकून तरातरा दाराशीं धांवल्या आपसांत कुजबुजू लागल्या.

३७ ओवी (जात्यावरील)

धरणं हिराला ग आलं। राजा दंडिल आतां तिला ॥
नाहीं दाल्ला घरिं बाइचा । कसा वखूत बांका आला ॥

दारांत घोडेस्वार व शिपाई पहातांच हिरा घाबरली. अंगाला घाम सुटला. गळा दाटला. ती काकुळतीनं शिपायांची विनवणी करूं लागली.

३८ लावणी

चुकी जाहली पाया पडते सांगा राजाला ॥
गुन्हा कर माफ गरीबाला ॥१॥
पुन्हां गडावर चुकुन पाय मी नाहीं ठेवणार ।
नका मज नेऊं तिथवर ॥२॥
बाळासाठीं घडलं सार न्हवत भान मजला ।
नका छळुं त्याच्या आईला ॥३॥
जा जा सांगा शिवरायाला लेक समज मजला ।
क्षमा कर येक वेळ तिजला ॥४॥

३९ आर्या

घाबरली बावरली पायां पडुं लागली रडूं आलें ॥
'नेऊं नका नका हो' वदली 'हें चुकुन पाप म्यां केलें' ॥

४० दिंडी

हंसू आवरेना स्वार शिपायांना ।
आम्ही कां आलों पोरिला कळेना ॥
'सोड भीती चल पालखीत बैस ।
नृपति नेतो तुज' म्हणति 'माहेरास'॥

पालखींतून हिरा गडावर आली. राजसभा दाटली होती. बावरलेल्या नजरेनं हिरानं सभेंत प्रवेश केला. बाळाजी आवजी

चिटणीसांनीं तिला 'ये ये बाळ, अशी माझ्या मागून ये' म्हणून सभेंत आणली.

४१ अनुष्टुप्

कोवळी वयाची पोर । कडेला बाळ कोवळें ॥
डोईचा पदर सारीत । सभेमध्यें प्रवेशली ॥

तिचें पाऊल सभेंत पडतांच

४२ पद

टकमक सारे तिला पाहती, छाति केवढी पोरीची ।
कड्यावरून ती कशी उतरली, शर्थ जाहली धैर्याची ॥१॥
अशक्य घडलं यमराजाला जिंकुन आली आदिशक्ती ।
आइरूपानें प्रगट जाहली वाटें भूवर देविच ती ॥२॥
पुत्रप्रेमा मातृहृदयिचा जगास अवघ्या कळवाया ।
घटना घडवुन आणी ऐसी अम्हांस वाटे प्रभुराया ॥३॥

४३ आर्या

धन्योद्‌गार ध्वनींनीं सारा दरबार गर्जुनी गेला ॥
शिवराय गौरवी तिज प्रेमानंदास पूर हो आला ॥

शिवरायाच्या तोंडून गौरवोद्‌गार बाहेर पडले !

४४ अनुष्टुप्

मुली शाबास शाबास । आज त्वां गड जिंकिला ।
महाद्वार कड्या कुलपें । सर्व लज्जित जाहलीं ॥

शिवरायांनीं तिचा गौरव केला

४५ पद (भाव धरारे)

र्हषित झाली । शिवरायें तिज गौरविली ॥धृ०॥
सन्मानूनी बसवी जवळी । अर्पियली तिज साडी चोळी ।
मोहरा भरुनी आणिली थाळी । ओटी भरली॥
शिवरायें तिज गौरविली ॥ १ ॥

**महाराष्ट्राच्या मुली धाडसी । प्रसवतील त्या शूर विराशी ।**
**नित्यचि होईल आमुची सरशी । वाणी वदली ।।**
**शिवरायें तिज गौरविली ।।२।।**

'जगाच्या पाठीवर जोपर्यंत हा रायगड उभा आहे, तोपर्यंत ह्या मुलीलाहि जग विसरणार नाहीं' असे धन्यतेचे उद्‌गार काढून पंतांकडे वळून श्रीछत्रपति शिवाजी महाराज म्हणाले पंत——

४६ श्लोक

**अजिक्य नच हा कडा शिकविला मुलीनें धडा ।**
**बुरूज चढवा वरी यश सुकीर्तिचा चौघडा ।।**
**कधीं न अरिला हटो 'हिरकणी' सुनामें नटो ।**
**तया सतत दर्शनें महति माउलीची पटो ।।**

पंतांनीं महाराजांना मुजरा केला, हिरानं तें लेकरूं महाराजांच्या पायावर घालून त्यांच्या चरणावर मस्तक ठेवलं. महाराजांनीं प्रेमाशीर्वादाची तिच्या पाठीवर थाप मारून तिला निरोप दिला. आणि पुत्रप्रेमाचा झेंडा फडकवीत हिरा गडाखालीं आली.

मातेची किती महती वर्णावी !

४७ अभंग

**पुत्रप्रेमाचा सागर । मातृहृदयीं निरंतर ।।१।।**
**मातारूपें प्रगटला । ईश जगा रक्षायाला ।।२।।**
**करी देह समर्पण । रक्षी बालकाचा प्राण ।।३।।**
**माते सारिखे दैवत । नाहीं कोठें त्रैलोक्यांत ।।४।।**
**ऐशा माउलीच्या पदा । धेनुदास वंदी सदा ।।५।।**

जयजय रघुवीर समर्थ !

# २. आग्र्याहून सुटका

१ साकी

**शौर्य धैर्य चातुर्य बुद्धिचें अद्‌भुत शिवरायाचें ।**
**प्रगट जाहलें आग्र्यामध्यें दिपले नेत्र जगाचे ।।**
**कथितों तीच कथा । ठेवुनी शिवचरणीं माथा ।।**

केवढा जिवावरचा भयंकर प्रसंग ! कपटनीतिपटु औरंगजेबानें शिवरायाला भेटीस बोलावून दगलबाजपणानें कैद केलें. नऊ वर्षें वयाचा संभाजी बरोबर होता. पितापुत्र सांपळ्यांत अडकले. सिद्दी फुलादखान कोतवालाच्या नेतृत्वाखालीं महाराजांच्या निवासस्थानाभोंवतीं फौजेचा वेढा पडला !

महाराजांना ठार करून टाकण्याचा औरंगजेबानें मनाशीं पक्का निश्चय केला होता. फिदा-इ-हुसेनखान नांवाच्या सरदाराच्या वाड्याचें बांधकाम पूर्ण होत आलें होतें. तेथें शिवाजी राजाला नेऊन डांबावयाचें व ठार करावयाचें, निश्चित झालें होतें. औरंगजेब त्या दिवसाची चातकासारखी वाट पहात होता.

२ श्लोक

**अरीला करूं ठार उन्मत्त फार ।**
**मराठा शिवाजी असे धूर्त चोर ।।**
**इथें गाडुनी टाकुं मातींत त्याला ।**
**चुवा डोंगरीचा बरा हातिं आला ।।**

इकडे महाराज सुटकेच्या क्षणाकडे दृष्टि लावून विचारांत मग्न झाले होते. त्यांना हृदयस्थ नारायणानें प्रेरणा केली!

**३ आर्या**

**झाली प्रसन्न अंबा झालीं अनुकल दैवतें सारीं ॥**
**करुं दिव्य एक धाडस स्फूर्ति मनीं देइ कृष्ण कंसारी ॥**

जगदंबेच्या कृपेनें त्यांच्या चित्तांत सुटकेची एक अत्यंत धाडसी कल्पना स्फुरली. पूर्वनियोजित सर्व गोष्टींची सिद्धता झाली.

महाराजांची प्रकृति योजनापूर्वक बिघडली! औषध पाण्याची धावपळ सुरू झाली. दानधर्म सुरू झाला. दुखणें बरें होण्यासाठीं भटजी, काजी, अमीर उमराव यांच्याकडे मोठमोठे मिठाईचे पेटारे येऊं जाऊं लागले.

**४ श्लोक**

**मिठाई फळें मोठ-मोठ्या जनांना ।**
**करंडे भरी पाठवी नित्य नाना ॥**
**कधी काजिला भटजिला भेट जाई ।**
**सुरू जाहली यापरी नित्य घाई ॥**

या पेटाऱ्यांची नित्य तपासणी करून फुलादखान निःशंक झाला होता. पेटाऱ्यांच्या बाबतींत आता फक्त ' जाने दो ' एवढा एक मंत्रच तोंडात शिल्लक होता.

५ दिंडी

भव्य पेटारे मधुनि मधुनि धाडी ।
उघडि पहारेकरि गोड फळें काढी ॥
नित्यक्रम हा कित्येक आले गेले ।
करंड्यांना जणुं मुक्तद्वार झाले ! ॥

मिठाई व गोड फळें खाऊन पहारेकरी कंटाळले. पेटारे राजरोसपणें, तपासणीशिवाय येऊं जाऊं लागले !

शिवाजी महाराज सांपळ्यांतून सुटण्याच्या विचारांत मग्न होते. इकडे औरंगजेब त्यांना ठार करण्याचा मनसुबा रचीत होता. अशा स्थितींत दोन पेटाऱ्यांत दोघे पितापुत्र वेगवेगळे बसून अनेक पेटाऱ्यांच्या घोळक्यांतून दि. १७ ऑगस्ट १६६६ रोजीं पसार झाले ! औरंगजेबाच्या मगरमिठींतून निसटले !

बरोबरचे कांहीं लोक निरनिराळ्या निमित्तानें आधींच बाहेर पडले होते.

महाराज पलंगावरून उतरतां क्षणींच हिरोजी फर्जंद त्यांच्या जागीं झोपला. मदारी मेहतर त्याचे पाय चेपीत होता. शिवाजीराजांनीं दिलेले सोन्याचें कडे घातलेला हिरोजीचा हात उघडा होता. कुणा पहारेकऱ्यानें सहज डोकावले तरी आजारी महाराज झोपले आहेत, असेंच दृश्य त्याला दिसे.

अंधार पडल्यावर मदारीनें व हिरोजीनें त्या गाद्या गिरद्या उशांच्या व शेल्याच्या साहचानें महाराज झोपले आहेत, असा देखावा निर्माण केला आणि औषध आणण्याच्या निमित्तानें ते दोघेहि पसार झाले !

आतां फक्त गादी उशाभोवतीं फुलादखानाचा व हजारों शिपायांच्या पहाऱ्याचा कडेकोट बंदोबस्त होता !

दुसरा दिवस उजाडला. आंतली सामसूम पहारेकऱ्याच्या लक्षांत आली. तेथें येऊन फुलादखानानें पाहिलें. तो भ्रमिष्टच झाला ! त्याचे डोळे पांढरे झाले ! अखेर औरंगजेबाच्या कानावर ही वार्ता गेली ! ! त्याच्या अंगाची लाही लाही झाली.

६ दिंडी

सिंह जाळ्यांतुनि सहज सुटुनि गेला ।
कुटिल औरंगा खिन्न मनीं झाला ॥
किती पहारे किति सैन्य दक्षता ही ।
व्यर्थ गेली लाजली बादशाही ॥

महाराष्ट्राच्या, इतिहासांत अशाच आणखी कांहीं अघटित घटना घडल्या आहेत. जरा लक्षपूर्वक ऐका हं !

महाराष्ट्रानें केवढा अघटित इतिहास घडविला आहे पहा !

७ फटका

काळालाहि कंप सुटावा असा दरारा चोंहिकडे । कुटील कपटी औरंग्याच्या पाशामाजीं शिव जखडे ॥१॥ तुरी देऊनी हातावरती सिंह सांपळ्यातूनि सुटे। अपूर्वता ही इतिहासाची नाहीं याला तोड कुठें ॥२॥ मुरारबाजी अमर जाहला स्वर्गा गेला धड लढलें । शौर्याची ही शर्थच झाली, कुठें हि ऐसें न च घडलें ॥३॥ तटावरूनी घोडा फेंकी घेउनि पाठीशीं प्राण । झांशीवाली एकच झाली मारुतिचें जणुं उड्डाण ॥४॥ त्रिखंड गाजे उडी जयाची वीर विनायक धैर्याचा । सागर लंघुनि पार जाहला अद्भुत विक्रम हा साचा ॥५॥

अगदीं अलीकडे बंगालनेंहि या अपूर्वतेंत भर घातली.

**सुभाषबाबू निसटुनि गेले थक्क जाहले जग सारे ।**
**लज्जित झाली ब्रिटीश सत्ता व्यर्थचि रात्रंदिन पाहरे ॥६॥**
**शौर्य धैर्य चातुर्य संगमीं पुनीत झाले नरवीर।**
**दास धेनुचा पदा वंदितों साह्य जयांना रघुवीर ॥७॥**

औरंगजेब खवळला, साऱ्या जगांत त्याच्या पराक्रमाला काळोखी फासली गेली.

दा. क्र. ९६२८३

### ८ आर्या

**मांतित सर्व मनोरथ गेले संतापला बहू चिडला ॥**
**पकडा, हुडका, शोधा, मारा म्हणुनी बहूत बडबडला ॥**

मथुरेंत बाल संभाजीला कृष्णाजी त्रिमल म्हणजे मोरोपंत पिंगळे यांचे मेव्हणे यांचेकडे ठेवून घाईगर्दीनें, दक्षिणेकडील चाहूल घेत, वेषांतर करून तीर्थयात्रा करीत निघाले. सर्वांनी ठरविलें.

### ९ पद (संग्राम गीत)

**चिडुनियां बादशहा गेला । महाराष्ट्र सर्व धुंडील ॥**
**घरगांव झोपड्या साऱ्या । पाहील लोक दंडील ॥**
**सज्जना देशभक्तांना । छळुनियां मान खंडील ॥**
**चाल॥ उत्तरेत म्हणूनी राहूं ।**
**करि शहा काय तें पाहूं ।**
**चाहूल तिकडची घेऊं ॥**
**जाऊं मग आनंदांत । प्रिय आपुल्या महाराष्ट्रांत ॥१॥**

सर्वांनीं वेषांतर केलें. गोसावी बैराग्यांचा मेळावा तयार झाला. शिवाजी महाराज संन्यासी बनले.

१० साकी

केशभार उतरला शिरिपरी राष्ट्रभार बहु झाला ।
जन कल्याणासाठीं सुजन हो शिवसंन्यासी बनला ।।
वेषांतर केलें । मुखानें नारायण बोले ।।

महाराष्ट्रांत त्वरेनें निघाले.

११ दिंडी

साधुमंडळ संन्यासि विरक्तांचें ।
तुच्छ ज्यासी जग ध्यान ईश्वराचें ।।
तीर्थ क्षेत्रें रमणीय जनस्थानें ।
पहात बैरागी जाति आनंदानें ।।

जातां जातां भविष्य कथन करीत, घराघरांतून भिक्षा घेत, आशीर्वादाचा दात्यांवर वर्षाव करीत, हें साधुमंडळ चाललें होतें. यांच्या साधुत्वाविषयीं कोण शंका घेईल ?

१२ फटका

भगवीं वस्त्रे भस्म विलेपन जटाभार शिरिं बांधियला । तुळशी रुद्राक्षांच्या माळा झोळी शोभे स्कंधाला ।।१।। चिमटा हातीं त्रिशुळ कुणाच्या काठि वांकडी करामधें । 'माई, भिक्षा वाढा' म्हणती शिरुन कुणाच्या घरामधें ।।२।। 'दुप्पट पैका मिळेल यंदा' 'धंदा वाढिस लागेल।' 'बेटा येइल पोटाबाई' 'वंशवेलही वाढेल' ।।३।। 'मनिं धरिले तें सिद्धिस जाईल' 'लग्न मुलाचें होईल'। 'रोग व्याधिही हरेल सारी' 'चिंता सरुनी जाईल' ।।४।। 'गुप्तधनाचा मिळेल हंडा' 'गंडा बांधा हातांत' । 'विभूति टाका

शेतामध्यें, पीकहि येइल जोमांत' ॥५॥ कुठें मंदिरीं, कुठें नदितिरीं, कुठें धर्मशाळेत धुनी। लावुनि बसती भिक्षा आणिती । 'अलख निरंजन' म्हणति कुणी ॥६॥ गुप्त वास हा नरवीरांना अला पांडवा परी असा । धेनूदासा मनीं भरवसा पार पडे हा सुखरुपसा ॥७॥

इकडे आईसाहेब चिंतेनें व्याकुळ झाल्या होत्या. सहा महिने झाले. त्या सारख्या झुरत होत्या. जगदंबेला आळवीत होत्या.

१३ दिंडी

अविंधाच्या अटकेंत बाळ माझा ।
आई गेला ! शिवराय भक्त तूझा ॥
रक्षि भूपाळा तूंच जगन्माते ।
पुत्रदानचि मज देई कन्यकेतें ॥

१४ आर्या

मंगलकार्यें सारीं बंदचि झालीं आनंद मावळला ॥
शिवनृप बंदी बनला आला राष्ट्रावरीच हा घाला ॥

लोकमान्य टिळकांना काळचापाण्याची शिक्षा झाल्यावर साऱ्या जनतेवर दुःखाची छाया पसरली. अनेकांनी अनेक प्रकारची व्रतवैकल्यें केली. असाच प्रकार त्यावेळी घडला.

१५ गज्जल

चालती कोणि अनवाणी । कुणी शय्या विडा त्यागी। खाईना कोणि पक्वान्न । विरागी जाहले योगी ॥१॥ प्रार्थिती नित्य देवाला । सोड बंदीतुनी राजा । भेटवी प्राण आम्हाला । झटे जो आमुच्या काजा ॥२॥ राम जातां वनीं जैसा तळमळे मानसीं भरत। बने महाराष्ट्र बैरागी । ध्यास शिव येइ कैं परत ॥३॥

**अनुष्ठानें ठायीं ठायीं। जपाला मंडळी बसली । देव कोंडोनि पाण्यांत। म्हणति हो वेळ ही कसली ! ॥४॥ जळाविण तळमळे मासा । प्रजा राजाविणें तैसी । तडफडे कष्टली फार । सुचेना कांहीं कोणासी ॥५॥**

पण अशाहि स्थितींत राज्यकारभार मात्र अत्यंत दक्षतेनें चालू होता.

**१६ आर्या**

**नव्हता नृप महाराष्ट्रीं राज्यधुरा वाहिली धुरीणांनीं ॥**
**कर्तव्यदक्ष सारे होते सज्जचि प्रसंग पाहोनी ॥**

**१७ ओवी**

**चोख राज्यव्यवहार । चालविती मुत्सद्दी चतुर ॥**
**शिवरायाचे शूर सरदार । रक्षिती राज्य दक्षतेनें ॥**

दुःखानें होरपळलेल्या आईसाहेबांनी दानधर्माचा सपाटा चालू केला. त्या पुण्याईनें तरी माझा बाळ मला लवकर भेटेल अशी त्यांची निष्ठा होती. त्यांनी मोरोपंत पिंगळे यांना सांगून ठेवलें होते कीं,

**१८ श्लोक**

**अतीथी भिकारी कुण्या याचकाला ।**
**नका धाडुं विन्मूख द्या द्रव्य त्याला ॥**
**सदावर्त चालू करा अन्नसत्र ।**
**प्रभूच्या कृपेला आम्ही होऊं पात्र ॥**

जगदंबेला त्या कळवळून आळवीत होत्या.

१९ पद (चाल–चंद्रकांत)

**श्रीजगदंबे, अंबे, गेला बाळ मला त्यजुनी । दिल्ली पतिनें सिंह जखडिला कपटनीति करुनी ।।१।। सुखरुप मजला भेटे केव्हां प्राण कंठीं आला । तुझाच बालक आहे माते, रक्षी तूं त्याला ।।२।। देव-धर्म-गोब्राह्मण सेवेसाठीं तळमळला । तळ हातीं शिर घेऊनि निशिदिनीं शत्रूशीं लढला ।।३।। देवि पदावरि मस्तक ठेऊनि अश्रूंनीं न्हाणी । करी विनवणी सद्‌गुणखाणी राजा आण झणीं ।।४।।**

नित्य गोपूजन, तुळशीपूजन व्हायचें. तेव्हांहि अश्रु ढाळीत त्या गोमातेची विनवणी करीतच असत.

२० आर्या

**गोमाते सुखवाया तुज करिं समशेर धरि शिवाजी गे ।**
**कां गे रुसलिस त्यावरि बंदींतुनि सोड भेटवी वेगें ।।**

दिवस लोटत होते, तसतशी त्यांची निराशा वाढू लागली. त्या क्षीण होत चालल्या. त्यांनीं अन्नहि वर्ज केलें !

२१ श्लोक

**दिलें अन्न सोडून त्या माउलीनें । करी तुष्ट दीनांजनां अन्नदानें ।।**
**घडो धर्म कांहीं पडो दृष्टि बाळ । सदा घालवी चिंतनीं याचि काळ ।।**

इकडे हें बैराग्या-गोसाव्यांचें मंडळ झपाटयानें मार्ग क्रमीत रायगडाच्या पायथ्याशी येऊन पोंचलें.

या मंडळाचे गुरु निराजीपंत. श्रीशिवाजी महाराजांसह इतर सर्व त्यांचे शिष्य !

ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

२२ साकी

निराजिपंता गुरुपद दिधले शिष्य तयाचे झाले ।
संन्यासी कुणि कुणि बैरागी अलख निरंजनवाले ।।
आले रायगडीं । वाजली भजनाची दिमडी ।।

आता तर त्यांच्या साधुत्वाच्या वेषाला ऊत आला होता !

२३ श्लोक

अस्ताव्यस्त जटा हातांत स्मरणी पाठीं मृगाजीनही ।
कोणी दंड कमंडलू धरि हातीं, ध्यानामधें मग्नही ।।
काखेला कुबड्या विभूति शरिरा माखोनि जे बैसले ।
कांहींसे मनिं लाजले, थबकले, थोडें हसूं लागले ।।

२४ आर्या

पाली दरवाज्यासी मांडियलें ठाण भजन दणदणित ।
करिती गोसावी ते आनंदित सर्व लक्ष किल्ल्यात ।।

इकडे आईसाहेब तर उपास-तापासानें व काळजीनें करपून गेल्या होत्या. शिवबाशिवाय त्यांना दशदिशा शून्य वाटत होत्या. प्रार्थनेचा टाहो त्या क्षणाक्षणाला फोडीत होत्या. त्या देवीपुढें धरणं धरून बसल्या.

२५ श्लोक

बये अंत पाहूं नको फार आता ।
अहर्नीश जाळी मला हीच चिंता ।।
कधीं बाळ भेटेल राजा शिवाजी ।
रिपूपाशिं हा गुंतला वीर गाजी ।।

कांही गुराख्यांचीं मुलं गडावर धांवत धांवत गेली व गोसावी बैरागी आल्याची वर्दी आईसाहेबांच्या कानापर्यंत पोंचली.

२६ दिंडी

**आल्यांत गोसावी दाढि जटावाल ।**
**भजन करत्याती रामराम बोल ॥**
**धुनी लावुन बसल्यात दरवज्यासी ।**
**र्वाद द्याया आलोय पायापाशीं ॥**

बैरागी पारमार्थिक माणसं. कुणी सोंगी ढोंगी नव्हत. ‘ येऊं द्या त्यांना आंत. ’ आईसाहेबांचा हुकूम झाला.

२७ आर्या

**साधू संत कुणीहि असोत येवोत नित्य या ठाया ।**
**आशीर्वादें त्यांच्या येइल सुखरूप ‘ बाळ ’ भेटाया ॥**

२८ पद (सवसे राम)

**सन्मानें आणिले । आले साधुजन आले ॥धृ०॥**
**भजनानंदीं मग्न जाहले रामधून चाले ।**
**पंतांनी वंदिले सादरें सदरेला ते बसले ॥१॥**
**आलि जिजाई वंदन करण्या मनांत गडबडले ।**
**हृदय धडधडूं लागे त्यांचे नेत्र सहज मिटलें ॥२॥**

गुरु महाराज (निराजीपंत) सर्वांचे पुढें होते. त्यांना वंदन करून जिजामातुःश्रींनीं डबडबल्या नेत्रांनीं आशीर्वाद मागितला.

२९ दिंडी

करुनि वंदन पुढिल्यास गहिंवरोनी।
म्हणे माता 'द्या आशिर्वाद कोणीं'॥
माउलीला भेटेल वत्स का हो ? ।
कंठ फुटला फोडोनि नित्य टाहो ॥

साधूंना वंदन करीत करीत जिजाबाई मागें मागें चालल्या, तेव्हां मध्यभागीं बसलेला साधु फार फार गडबडला ! अस्थिर झाला ! !

३० आर्या

अस्थिर झाला साधू गडबडला अंतरांत गहिंवरला ।
तळमळला हृदयांतरिं जाइ जिजाई नमावया त्याला ॥
जिजाई खाली वाकून वंदन करणार तोंच--

३१ दिंडी

जोडलेले धरि हात म्हणे 'आई!' ।
पुत्र 'शिवबा मी' ठेवि पायीं डोई ॥
आवरेना दोघांस अश्रुपूर ।
होइ चिंता काळजी सर्व दूर ॥

कोण ? शिवबा ! शिवबा ! ! माझा प्राण आला. मग काय विचारतां, क्षणार्धांत गडावर आनंदाचा महासागर उफाळला! महाराज आले ! शिवरायांनीं मातृचरण नेत्रोदकानें न्हाणले. आईसाहेबांनीं शिवबाला हृदयाशीं घट्ट धरलें. आईची माया. तिचं वर्णन करणं अशक्य. गडावर साखरा वाटल्या. दसऱ्याच्या आधींच दिवाळी उजाडली. पंतांनीं अत्यानंदानें हुकूम सोडला !

३२ पद (संग्राम गीत)

आला हो आला शिवबा । तोफेला बत्ती द्याहो ।।
वाजवा नगारे कर्णे । दशदिशांस वार्ता जावो ।।
उत्सवदिन महाराष्ट्राचा । आनंदा भरती येवो ।।
चाल ।। दसरा सण आज दिवाळी ।
गोकुळांत ये वनमाळी ।
हर्षानें पिटली टाळी ।।
राष्ट्राचा प्राणचि आला । परमेश जणूं अवतरला ।।

शिवरायाचा पुनर्जन्मच झाला. शिवरायाच्या शौर्य धैर्य पराक्रमाची व विशेषतः बुद्धिकौशल्याची वाखाणणी जगानें केली. धन्य छत्रपति शिवाजी महाराज! तुमच्या तोडीचा पुरुष अजून जगांत निर्माण झाला नाहीं.

छत्रपति शिवाजी महाराज की जय !
जय जय रघुवीर समर्थ !

# ३. बाळाजी आवजी चिटणीस

राजापुरांत लिलाव चालला होता. गुलामांचा दलाल कर्कश आवाजांत हातवारे करीत किंमत पुकारीत होता. चबुतऱ्यावर विक्रीसाठीं एक तरुण विधवा आर्यस्त्री उभी होती.

१ दिंडी

**तरुण विधवा संगतीं तीन बाळें ।**
**दीन झालीं गांजिलीं कलीकाळें ॥**
**उभ्या बाजारीं मांडिला लिलाव ।**
**कुठें देवा लपलास म्हणे धांव ॥**

अधोमुख होऊन दुःखाश्रु ढाळीत आपल्या तीन लेंकरांना पोटीशीं धरून खालीं मान घालून ती सारखी हुंदके देत होती.

२ आर्या

**आर्यसतीचा विक्रय धेनु जणूं चालली कसाबकरीं ।**
**धरि तीन लेकरांना पोटीशीं ढाळि अश्रु शोक करी ॥**

३ अंजनीगीत

**हरिश्चंद्राची तारा राणी । विश्वामित्र विकाया आणी ।**
**तशीच दुर्दैवाची कहाणी । आर्यसतीच्याही ॥**

४ ओवी

**राजापूरच्या बाजारीं । उभी केली चबुतऱ्यावरी ।**
**लिलावाची ललकारी । सुरू झाली विबुध हो ॥**

५ श्लोक

" पन्नास, पन्नास' हि दोन वार। झाले, सतीचा सुटलाच धीर ॥
तों 'साठ' आला ध्वनि कानिं तीच्या। अंगा सुटे कंपचि त्या सतीच्या ॥

एका काळ्याकभिन्न हबशाची ही मागणी होती. ६० रुपये पुकारून तो तिच्याकडे टक लावून पहात होता.

६ आर्या

काळाकभिन्न हबशी टवकारुनि नेत्र तिजकडे पाही ॥
सौदा पटलाच असें समजुनि नेण्यास सज्ज तिज होई ॥

आतां आपण हबशाच्या घरीं जाणार! तिचे डोळे पाण्यानें डबडबून आले. ते तिघे जीव वेड्यासारखे आईकडे, दलालाकडे, व जमलेल्या लोकांकडे पहात होते. चौघांचें भवितव्य ठरत होतें. आतां जन्मभर हबशाच्या घरांत! तिचें हृदय फाटून गेलें.

७ श्लोक

नशिब फुटलें देवा देवा! गुलाम जींग जाहले।
नरक बरवा वाटे मातें कशास जित ठेविलें॥
हबशि मजला ग्रासी राहू आकांत बघसी कसा।
चिमणि चिमणि माझीं बाळें तुझाचि मज भंवसा॥

८ श्लोक

कसाबा करीं चाललें श्रीहरी रे। धुळीला मिळे शील अब्रु सख्या रे॥
कशाचा आतां धर्म हिंदुत्व गेलें। पशुतुल्य झालें मनुष्यत्व मेलें॥

मागणीचा शेवट झाला. पुष्कळ प्रयत्न करूनहि साठावर कोणी बोलेना. दलाल तीनवार पुकारण्याच्या बेतांत आला. 'तीन' हा अर्धवट शब्दोच्चार त्याच्या तोंडांतून बाहेर पडतो न पडतो इतक्यांत त्या गर्दीच्या मागून

९ दिंडी

शंभराची मागणी पुन्हां झाली। वृत्ति तेजाळलि मान खालिं गेली।।
तिरस्कारानें हबशी पाहि त्यास। द्रव्यलोभे आनंद दलालास।।

१० ओवी

लोक झाले आश्चर्यचकित। तीनवार लिलाव होत।
पैसे मोजूनि दलालाप्रत। चौघांसी विकत घेतलें।।

तो विकत घेणारा गृहस्थ कोण, हें बाई पाहूं शकली नाहीं व विकत घेतलेली बाई कोण इकडे त्या गृहस्थाचेहि लक्ष गेलें नाहीं. केवळ एका हिंदुधर्म भगिनीची सुटका करावी, या एका भावनेनेंच त्यानें हा सौदा केला होता. तो गृहस्थ निघाला. लिलावाच्या चबुतऱ्यावरून बाईहि मुलांसह उतरून त्या गृहस्थाच्या मागून अधोवदनानें चालू लागली.

११ श्लोक

कळेना मुलांना कुठें जावयाचें।
रडे आई कां शब्द येई न वाचें।।
निघाला धनी मागुनी हे गुलाम।
निघाले पडे तें करायास काम।।

रस्त्याकडे न पाहतांच बाई कशीबशीं पावलें टाकीत चालली होती. धन्याच्या मागोमाग एका घरांत ती शिरली. घरांत येतांच त्या धन्याने तोंड वळवून मागें बाईकडे पाहिलें. तोंच, तिनें 'दादा!' म्हणून हंबरडा फोडला!!

१२ आर्या

येतां गृहिं परतोनी पाही बाईस कोण ही आली।
हंबरडा फोडी ती, दादा म्हणुनी गळां मिठी घाली।।

तिचा तो सख्खा भाऊ होता! त्याचें नांव विसाजी शंकर तंगारे.

१३ श्लोक

रडे आई मामा तिन्ही लेकरें तीं ।
रडूं लागले दुःख आनंद चित्तीं ॥
कशी ताई गेलीस चांडाळ हातीं ।
सुखाची कशानें अशी होय माती ॥

ताई ! देवानेंच मला बाजारांत येण्याची बुद्धि दिली !

१४ (अंजनीगीत)

घोर अनर्थांतुनी वाचवी । प्रभूच मज तुजकडे पाठवी ।
सुटलीस दैवें तया सांठवी । हृदयांतरीं नित्य ॥

असें म्हणून त्यानें तिला सांगितलें,

१५ आर्या

जा कुंकु लाव भाळीं सांभाळी बाळ हे तिघे आपुले ॥
जाइल काळ निघोनी देवा घरचीं फुलेंच हीं न मुलें ॥

तिनें हंबरडा फोडला आणि म्हणाली, 'दादा! काळानें माझे कुंकू पुसलें रे!

१६ पद (संग्राम गीत)

मी विधवा झाले दादा । काळानें कुंकू पुसिलें ॥
सिद्दीचा झाला कोप । सागरीं पती बुडवीले ॥
लुटुनियां सर्व घरदार । बंदिवान आम्हां केले ॥
चाल ॥ न्या गुलाम परदेशाला ।
विकुनीया टाका इजला ।
हा हुकुम फर्मावीला ॥
गलबतीं आम्हां चढवीलें । काळानें कुंकू पुसिलें ॥

या बाईंचे नांव रखमाबाई. यांचे पति आवजी हरि चित्रे. आवजी हा सिद्दीचा मुजुमदार होता. त्यांना तीन मुलें. एकाचें नांव बाळाजी, दुसरा चिमणाजी व तिसरा शामजी. सिद्दीच्या दरबारांत मुजुमदाराचा मानमरातब चांगला होता. संपत्तीहि विपुल होती. परंतु दुर्दैवाने एके दिवशी सिद्दीची करडी नजर फिरली. आवजी कांहीं सामान्य गुन्ह्यांत सांपडला व त्याला शिक्षा म्हणून सिद्दीने त्याला पोत्यांत बांधून समुद्रांत बुडवून त्याचा जीव घेतला आणि त्याच्या घरादारावरून नांगर फिरविला!! या बाईला गुलाम म्हणून परदेशांत हिंदुस्थानचे बाहेर विकण्याच्या अटीवर गुलामांच्या दलालांच्या ताब्यांत सिद्दीनें दिली होती.

तीन लेकरांसह बाईला जहाजावर चढविलें.

**१७ आर्या**

**कोंदट खुजट कुबटशा जागीं रकट्यावरी तिघे बाळ ।।**
**श्रमले झोपीं गेले वाटे तिज फाटलेंच आभाळ ।।**

लेकरांत जीव अडकला होता. नाहींतर समुद्रांत उडी टाकून प्राणत्याग करण्याचे विचार मनांत घोळत होते. झोपलेल्या लेकराकडे पहात ती दुःखाश्रु ढाळीत होती. इतक्यांत–

**१८ साकी**

**सुटलें वादळ दर्या खवळे सतिछळ त्या सहवेना ।**
**जहाज राजापुरीं आणिलें म्हणती वाचवुं प्राणा ।।**
**संकट हें मोठें । जावें दुसरिकडे कोठें ? ।।**

भयंकर वादळ झालें. जहाज राजापूर बंदरांत थाबवावें लागलें. बाईनें धिटाईनें व्यापाऱ्याला विनंती केली.

१९ श्लोक

इथेंची विका हो नका नेऊं दूर। वृथा त्रास हा खर्च होईल फार ॥
त्यानें उत्तर दिलें.

कसा ओढवूं सिद्दिचा कोप बाई। कृतांतापरी प्राण माझाच घेई ॥
त्यानें बाईस बजावलें.

२० आर्या

ज्यासी विकील तुजला दलाल तेथेंचि नांव बदलून ॥
गुप्तपणें राहशिल तरि याच क्षणीं टाकितों तुला विकुन ॥
रखमाबाईनें तत्क्षणीं मान्यता दिली !

२१ ओवी

जन्मवरी अज्ञातवास। सेवीन स्मरून ईश्वरास ॥
सांगते मजला विकाल ज्यास। राहीन तेथें गुप्तरूपें ॥

त्या व्यापाऱ्याने मुलांसह त्या बाईला राजापूरच्या दलालास विकून टाकली.

दलालानें तिचा राजापूरच्या बाजारांत लिलाव सुरू केला.

२२ आर्या

राजापुरीं सतिस त्या विक्रीस्तव चौथऱ्यावरी नेली ॥
बाजारिं उभी केली लिलाव घ्यायास मंडळी जमली ॥

अशा प्रकारें या बाईचा तीन लेकरांसह राजापुरांत लिलाव चालला होता. त्या संकटांतून तिची सुटका होऊन ती आपल्या भावाच्याच घरीं ईशकृपेनें आली. जंजिऱ्यापासून साठ कोस दूर असलेल्या राजापुरांत आली.

२३ पद (भाव धरा रे)

श्रीहरि सतिला । संकटीं रक्षिण्या आला ।।धृ.।।
राजापुरच्या भरबाजारीं । विकावयास्तव आणिली नारी ।।
धाय मोकलुनि रडे सुंदरी । प्रार्थी प्रभुला ।।१।।
सति द्रौपदिच्या साह्यासाठीं । धांवे जैसा प्रभु जगजेठी ।।
बाजारीं बहु झाली दाटी । गर्दित घुसला ।।२।।

बंधूच्या रूपानें परमेश्वरच ऐनवेळीं लिलावाच्या जागी आला होता. केवळ एका आर्यस्त्रीला संकटांतून सोडवावें, एवढ्याच हेतूने त्यानें लिलाव घेतला होता.

२४ पद (भूपाळी)

त्रिवार झाला लिलाव मंजुर विकिली ती काया ।
कुणी घेतलें तिला न कळलें लागे चालाया ।।
घेणाराही सज्जन निरखुनि अबला ना पाही ।
बुरखा घेउनि तोंडावरि ती त्या मागुनि जाई ।।
अघटित करणी प्रभुरायाची आणी माहेरास ।
आला होता सख्खा भाऊ लिलाव घ्यायास ।।
धर्मभगिनि कुणि चांडाळाच्या हातीं नच जावी ।
म्हणुनि संकटांतुनी सोडवी सती आर्यदेवी ।।
आर्यसतीच्या अब्रूसाठीं तनमन धन देती ।
धेनुदास त्या महानुभावा नित करितो प्रणती ।।

अशी अघटित घटना घडून चाडाळाच्या तावडींतून बाईची सुटका होऊन ती आपल्या भावाच्याच घरीं आली. एवढा कथाभाग आपण आतापर्यंत ऐकलाच आहे.

२५ कामदा

वाढुं लागलीं तीन लेकरें। माय देखुनी दुःख वीसरे ॥
दत्तमूर्ति ही ठेव सुखि हरी। तारि मलाही शोकसागरीं ॥

मामाच्या घरीं हीं तीन लेंकरें लहानाची मोठीं होऊं लागलीं. बाळाजी सर्वांत मोठा. त्याचं अक्षर फारच सुंदर होतं.

२६ आर्या

बाळाजी गुणखाणी मोत्यावाणीच अक्षरें ज्याचीं ॥
कसबेदार कचेरिस इच्छा मनिं होय त्यास नोकरिची ॥

गुप्तरूपानं नाव बदलून त्यानं नोकरी धरली. कसबेदार म्हणजेच सुभेदाराच्या कचेरींत.

२७ दिंडी

पुसुनि मामा मातेस रुजू झाला ।
लेखनाचें लागलें काम त्याला ॥
नांव बदलोनी करी नित्य सेवा ।
म्हणे केव्हां येईल दया देवा ॥

राजापूरच्या कसबेदाराकडे पत्र लेखनाच्या कामावर तो रुजू झाला. एके दिवशी–

२८ अभंग

कचेरींत आला शिपाई त्वरेनें। म्हणे हुजुरानें बोलाविलें ॥
तेव्हां सुभेदारें घेतला सलाम। लेखनाचें काम सांगीतलें ॥
पत्र शिवबास सांगे लिहायास। आनंद चित्तास बाळाजीच्या ॥
देव धर्म धेनू रक्षावयासाठीं। करी आटाआटी धन्य राजा ॥
तयाच्याच हातीं हस्ताक्षर गेलें। मन आनंदले अतिशय ॥
जाऊं कां भेटीला अर्पूं देह तया। येईल का दया गरीबाची ॥
धेनुदास म्हणे ऐशा विचारांनीं। ध्यानीं मनीं स्वप्नीं वेढिलें त्या ॥

अविधानें आपल्या घरादाराचें वाटोळे केलें, ही गोष्ट शिवरायाच्या कानीं घालण्याची संधी तो शोधीत होता.

२९ श्लोक

**एकांतीं बसुनी विचार करुनी हातीं धरी लेखणी ।**
**राजा! घे पदरांत दास म्हणुनी हस्ताक्षरें लेहुनी ।**
**केलें पत्र तयार ठेवुनि दिलें तें कंबरे खोंवुनी ।**
**संधी साधुनि पाठवी प्रभुकडे ईशा स्मरोनी मनीं ।।**

कंबरेला खोंवलेलें पत्र बरोबर घेऊन तो रोज कचेरींत जात होता. पुन्हा कसबेदाराचें पत्र शिवाजी महाराजांना पाठविण्याचा प्रसंग आला तेव्हा–

३० आर्या

**धडधडत्या हृदयानें कंपित हस्तेंचि आपुलें पत्र ।।**
**थैलित घुसडुनि दिधलें लाभाया शिवप्रभू कृपाछत्र ।।**

जिवाचा धडा करून कसबेदाराच्या पत्राबरोबरच त्यानें आपलें पत्र थैलींत घुसडून दिलें ! कसबेदार शिवाजीमहाराजांची आळवणी कशासाठी करीत होता. तें ऐका –

३१ फटका

**राजापुरचा वखारवाला इंग्रज झाला बेमान ।**
**संगनमत सिद्दीसी केलें उडवूं त्याची धुळधाण ।।**
**पन्हाळगडच्या वेढयामाजीं सिंह सांपडे ज्या वेळीं ।**
**क्षुद्र लांडगे कोल्हे कुत्रे मारित होते आरोळी ।।**

निश्चय झाला शिवरायाचा राजगडावर तळ पडला ।
मराठी मावळ सेना जमली कसबेदारहि गडबडला ॥
अर्ज विनंत्या आळवणी करि कसबेदार बहु रायाची ।
लेखन समयीं संधिच आली बाळाजीला सोन्याची ॥

ही पत्राची थैली राजगडीं शिवाजीराजांच्या हातीं येऊन पडली. पत्रांतील अक्षर पाहातांच राजांना आनंद झाला.

३२ दिंडी

नव्हे अक्षर नक्षत्र जणूं माळा। देखुनीयां मनिं मोद बहु नृपाळा ॥
पत्र पंतांचे हातीं नृपति देई । दुजें थैलींतुनि वाचण्यास घेई ॥

हातांत पत्र घेऊन महाराज पाहतात, तोंच

३३ ओवी

तेंच अक्षर लेखक तोच । सोडवा म्हणे आमुचा जाच ॥
ब्रीदावळी करा साच । हासला नृपाळ मानसीं ॥

पत्रांतील मजकूर व तें पाठविणाऱ्याचें चातुर्य आणि त्याची धडाडी पाहून राजे संतुष्ट झाले.

३४ आर्या

चातुर्य धैर्य त्याचें अक्षर पाहूनि तुष्ट शिवराणा ॥
करि स्वारिची तयारी जाणें कोठें कळे न परि कोणा ॥

महाराज जातीनें स्वारीवर निघणार ही बातमी गडभर पसरली; पण कोठें जावयाचें कोणासच ठाऊक नव्हतें. एके दिवशीं अचानक हुकूम सुटला. शिंग वाजलें !

## ३५ पोवाडा

इशारतिचं शिंग वाजलं, सैन्य निघालं, कोंकणांत आलं, उतरुनी घाट सह्याद्रीचा । धरला त्यानं मार्ग राजापुरचा । काढाया कांटा इंग्रजाचा । धांवला मायबाप गरीबांचा ॥ जी ॥ ॥ १ ॥ मध्यरात्र शांत वेळ झाली, जनता झोंपी गेली, स्वारी मग केली, वेढिली वखार वाडा सारा । कापला पाहारेकरी गोरा । माजलास फार म्हणत चोरा । आतां कर येथुन पोबारा ॥२॥ सुभेदार गोरे अंमलदार केले गिरफ्दार, लुटलं भांडार । आगीचा लोळ पेटला गांवांत । साऱ्या दुष्टांचा केला निःपात । कुठुन आला घाला म्हणति रातोरात । रक्ताचा पाट साऱ्या नगरांत ॥३॥

## ३६ आर्या

नाणीं, मोहरा पुतळ्या होनांचा द्रव्यकोट वाड्यांत ॥<br>
रचिला शिवसेनेनें रिपु घाली सर्व बंदीखान्यांत ॥

सुभेदाराच्या विस्तीर्ण वाड्यांत छत्रपति शिवाजी महाराज गादीवर विराजमान झाले होते. विजयानें नटलेले सरदार आसपास अदबीनें उभे राहिले होते. कित्येक इंग्रज कैदी, तो सुभेदार आणि त्याची माणसं बंदिखान्यांत अडकली होती. सोन्याचांदीचे आणि हिऱ्यामोत्यांचे ढीग पडले होते व त्यांत भर घालण्याचा शिवसेनेचा सपाटा चालला होता. गावांतलें झाडून सारे सिद्दी आणि परकीय व्यापारी लुटले जात होते. शिवाजी महाराज त्या दुष्टांना बजावीत होते.

३७ पद (संग्रामगीत)

अब्रूवर घालुनि घाला । बाजारीं विकल्या ललना ॥
कापिलीं कोंवळीं बाळें । कापिल्या गाईच्या माना ॥
फोडिल्या मूर्ति देवांच्या । पापाला नाहीं गणना ॥
चाल ॥ भोगा फळ त्याचें आतां । श्रीहरी आमुचा त्राता ।
गेली ना सत्ता मत्ता ॥ गणना नच दुष्कृत्यांना । बाजारीं० ॥

इकडे विसाजी तुंगारे यांच्या वाड्यांतील माणसेंहि घाबरून गेली होती. रखमाबाई बाहेर न पडण्याविषयीं बाळाजीस बजावीत होती. बाळाजी ओटीवर येरझारा घालीत होता. बाहेर आरडा-ओरड आणि दंगल चालूच होती. अरुणोदय होऊन फटफटीत उजाडले इतक्यांत —

३८ आर्या

दणके बसले दारा, 'उघडा उघडा त्वरा करा' म्हणती ॥
घाबरले, गडबडले कोण तुम्हां पाहिजे हळूं पुसती ॥

३९ ओवी

वाड्यांत आठ दहा जण । शिरले सरकारी हुकुमावरून ॥
गेले बाळाजीस घेऊन । धाय मोकलुनी माय रडे ॥

शिपायांनी बाळाजीला नेऊन शिवरायापुढें हजर केले.

४० अभंग

शिवचरणासी घाली लोटांगण । म्हणे 'कृपा पूर्ण करा स्वामी' ॥
'तुझेंच हें पत्र तुझें हें अक्षर । आहे कां सत्वर सांग मज' ॥
'होय, महाराज!' बाळाजी बोलला । शिव संतोषला अंतर्यामीं ।
धेनुदास म्हणे कार्य सिद्धी गेलें । चालुनीयां आलें भाग्य गृहीं ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय दा. क्र. १९८२३

४१ आर्या

धांवे वत्सापाठीं गाय तशी माय धांवली वेगें ॥
आली शिवचरणासी प्राणाची भीक माउली मागें ॥

४२ पद (चंद्रकांत)

मी वनवासी दुबळी अबला प्राणदान द्या हो ।
मत्पुत्राला, पडतें पाया फोडियला टाहो ॥
धर्म भगिनि मी या पायाची ध्यानीं घ्या नातें ।
अपराधाची क्षमा करा द्या सोडुनि पुत्रातें ॥
गेले पति दुष्टांनि मारिले, सागरिं बुडवीले ।
लुटिलें सारें गृहधन माझें वनवासी झालें ॥
शिवाजी महाराजांनीं तिला धीर दिला ––

४३ श्लोक

त्यजी शोक माई सरे दुःख सारें ।
विझाले पुरे जाण सारे निखारे ॥
तुझा धर्म बंधू मला मान माते ।
अखंडीत हेंची असो सत्य नातें ॥

असें म्हणून शिवरायांनी ताटांत मोहरा व खणलुगडें घालून तें ताट तिला दिलें.

४४ आर्या

लुगडें चोळी मोहरा घालोनी ताट आणविलें रायें ॥
अर्पियलें भगिनीला चित्तीं आनंद ना तिच्या माये ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थल
अनुक्रमांक ८४४२९ विभाग काव्य
२०२४ नोंद दि. २०१३८९

४५ अंजनीगीत

प्रेमाश्रूंनीं शिवचरणाला । न्हाणियलें ब
देव दयाघन धांवुनि आला । शिवरूपें वाटे

४६ अनुष्टुप्

णकृत्यें लया गेलीं । काळोखी रात्र संपली ।।
शिवभानू वंदा सप्रेम सादरें ।।

४७ अभंग

लूट लाभ शिवबाला । दुष्ट दंडण्यासी आला ।।
हिरे मोती चांदी सोनें । न्याया पुरती ना वाहनें ।।
रत्न बाळाजी लाभलें । शिववैभव शोभलें ।।
धेनुदासा मोद झाला । राम शिवरूपें आला ।।

छत्रपति शिवाजी महाराज की जय ।
जयजय रघुवीर समर्थ ।।

REFBK-0016283
REFBK-0016283

अनाथ विद्यार्थी गृह
प्रकाशन, पुणे २

मुद्रक : दि. दा. गांगल, लोकसंग्रह मुद्रणालय, १७८६ सदाशिव पेठ, पुणे २.
प्रकाशक : डॉ. गं. श्री. कोशे, अ. वि. गृह प्रकाशनासाठी, १७८६ सदाशिव पेठ, पुणे २.

मराठी ग्रंथ … दा. क्र. १९२३ … संग्र

## …ळ यांचें वाङ्मय

धांवे वत्सापाठीं …

… (श्रीसमर्थ रामदासांच्या चरित्रा- १-५० आली शिव… …ाख्यानें + १ नाथ चरित्र)

… चरितामृत (श्रीचौंडेमहाराजांचें कीर्तनचरित्र … …ाख्यानें)

…विराटपर्व (सात आख्यानें)

श्रीसमर्थप्रबोध (ग्रंथराजदासबोध…

फुलांची परडी (श्रीसमर्थ गोमाते … …व्या नात । भरलेलीं)

नि पुत्रातें ॥

२-००

६ **गोष्टीरूप श्रीसमर्थ** (भाग १ ला) १-८०

७ **धेनुसत्यनारायणकथा** (मूळश्लोक व त्यांचें ओवीबद्ध स्पष्टीकरण) ०

### प्रसिद्धीची वाट पहात असलेलीं

**कीर्तनरामायण** (४५ आख्यानें) या शिवाय भीष्मचरित्र, परशुराम चरित्र, धेनुहरण, शिवजन्म, साईबाबा, संतरोहिदास, नामदेव दिवाळी, संत सखाराम महाराज (अंमळनेरकर), कर्णास ब्रह्मशाप, श्रीबालाजी (नासिक), रुक्मिणीस्वयंवर इ.

खालील पत्त्यावर मागवा. ट. ख. वेगळा.

**श्रीगोवर्धनसंस्था**, शुक्रवार पेठ, नातूबाग, पुणें, २.

---

### मातृगीता

ले. **गोवर्धनदास डोळे.**

मातेचा महिमा वर्णन करणाऱ्या सुंदर काव्यांचा संग्रह १-१०

**अनाथ विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणें २.**